# पाळी

दे जगू मला किंवा दे मरू तरी
सोडू नको हरी असा अधांतरी ||१||

एकदा म्हणसी तुझाच मी अंश
एकदा म्हणसी तूच तुझे बघ ||२||

उभा विटेवरी स्वतः युगे युगे
जन्मोजन्मी का मज फिरावे लागे ||३||

तूच दिली बुद्धी तर तम भाव
याचमुळे आला आप पर भाव ||४||

आता म्हणे मान सम सुख दुःख
तुझ्याविना कशी करू मी परख ||५||

तूच माझे सुख घे मज जवळी
म्हणता मी सांगे येऊ दे तुझी पाळी ||६||

– नारायण
आषाढी एकादशी शके १९४५
(०६/२९/२३)